जागतिक बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र राज्य कृषिव्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्पाच्या अंमलबलजावणी करिता संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये संस्था स्थापन करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक :- कृव्यप्र ४६१९/प्र.क्र.५७/८-अे,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ सप्टेंबर, २०१९

संदर्भ :

१. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्रमांक:- कृव्यप्र - ४६१८/प्र.क्र.१०२/८-अे, दिनांक १९ जानेवारी, २०१९
२. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्रमांक:- कृव्यप्र - ४६१८/प्र.क्र.१०२/८-अे, दिनांक २७ मे, २०१९
३. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्रमांक:- कृव्यप्र - ४६१८/प्र.क्र.१२९/८-अे, दिनांक २७ मे, २०१९
४. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्रमांक:- कृव्यप्र - ४६१९/प्र.क्र.७० /८-अे, दिनांक ११ सप्टेंबर, २०१९

प्रस्तावना:

राज्य शासनाने जागतिक बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (State of Maharashtra’s Agribusiness and Rural Transformation Project) राबविण्यास संदर्भांकित दि.१९ जानेवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये तत्वत: मान्यता दिली होती तसेच, या प्रकल्पाचा आराखडा तयार करण्याकरिता आयुक्त (कृषि) यांच्या अधिपत्याखाली ३७ पदांसह प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्थापण्यास मान्यता दिली होती, आणि राज्य स्तरावरून प्रकल्पाचे संनियंत्रण करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प सुकाणू समिती गठीत केलेली आहे. संदर्भांकित दि. २७ मे, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकरिता उच्चस्तर सचिव समितीच्या मान्यतेने ३७ पदांची निर्मिती करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांतर्गत US $ ३०० दशलक्ष (सुमारे रु. २१०० कोटी) गुंतवणूक अपेक्षित असून त्यापैकी जागतिक बँकेकडून (IBRD) US $ २१० दशलक्ष कर्ज घेण्यात येणार आहे. या प्रकल्पाद्वारे राज्यातील विविध पिकांच्या कार्यक्षम मूल्य-साखळया विकसीत करुन त्यात संघटीत शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्याकरिता, शासकीय योजना / प्रकल्पांच्या माध्यमातून यापूर्वी संघटीत केलेल्या शेतकऱ्यांना शेत मालावर प्रक्रिया करून तो थेट खाजगी उद्योजकांना विक्री करण्यासाठी बाजार जोडणी व्यवस्था निर्माण करण्याचा शासनाचा मानस आहे. दि. ९ सप्टेंबर, २०१९ रोजी पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्रकल्पास शासनाची मान्यता प्राप्त झाली असून त्याबाबत संदर्भांकित दि. ११ सप्टेंबर, २०१९ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाची संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये संस्था स्थापून प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने, राज्य स्तरावर “महाराष्ट्र राज्य कृषि व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (SMART) संस्था” स्थापन करण्यास मान्यता देण्याची व सदर संस्थेकरिता स्वतंत्र बँक खाते उघडण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:

१. महाराष्ट्र राज्य कृषि व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाची (State of Maharashtra's Agribusiness and Rural Transformation - SMART) राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये ७ वर्ष कालावधीत (सन २०१९-२० ते २०२६-२७ पर्यंत) अंमलबजावणी करण्यास शासनाने संदर्भांकित शासन निर्णय दि. ११ सप्टेंबर, २०१९ अन्वये मान्यता दिली असून सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणी करिता संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये राज्य स्तरावर "महाराष्ट्र राज्य कृषि व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (SMART) संस्था" स्थापून प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. आयुक्त (कृषि), पुणे यांनी सदर संस्थेची नोंदणी तातडीने करून घ्यावी तसेच, या संस्थेंतर्गत महाराष्ट्र राज्य कृषि व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (SMART) संस्थेंतर्गत प्रकल्पाचा समन्वय व व्यवस्थापन कक्ष स्थापन करावा. सदर संस्था सचिव (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात यावी तसेच, संस्थेच्या नियामक मंडळामध्ये परिशिष्ट - अ मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांचा समावेश राहील. महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाचे प्रकल्प संचालक हे सदर संस्थेचे कार्यकारी संचालक राहतील व त्यांच्या नियंत्रणाखाली या प्रकल्पाच्या प्रकल्प समन्वय आणि व्यवस्थापन कक्षाचे कामकाज चालेल.

३. महाराष्ट्र राज्य कृषि व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (SMART) संस्थेचे नियम व उप नियम हे मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील प्रकल्प सुकाणू समितीच्या मान्यतेने निश्चित करावेत.

४. महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाच्या समन्वय व व्यवस्थापन कक्षाकरिता यापूर्वी संदर्भांकित शासन निर्णय दि. २७ मे, २०१९ अन्वये प्रकल्प कालावधी पर्यंत अस्थायी स्वरुपात कृषि आयुक्तालयाच्या आस्थापनेवर निर्माण केलेली ३७ पदे (१४ शासकीय पदे व २३ कंत्राटी पदे) महाराष्ट्र राज्य कृषि व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (SMART) संस्थेकडे हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, प्रकल्पाच्या समन्वय व व्यवस्थापन कक्षासाठी आवश्यक पदांचा आकृतिबंध मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील प्रकल्प सुकाणू समितीच्या मान्यतेने निश्चित करावा, आणि उच्चस्तर सचिव समितीच्या मान्यतेने प्रकल्प कालावधी पर्यंत अस्थायी स्वरुपात आवश्यक पदांची निर्मिती सदर संस्थेच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात यावीत.

५. सदर संस्थेकरिता महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाव्यतिरिक्त आवश्यक असलेल्या पदांखेरीज कोणत्याही स्वतंत्र पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात येणार नाही. प्रकल्पाकरिता प्रकल्प कालावधी पर्यंत अस्थायी स्वरुपात पदे निर्माण करण्यात येतील व प्रकल्प कालावधी संपुष्टात आल्यानंतर सदर पदे कायमस्वरुपी आपोआप निरसित होतील.

६. संदर्भांकित शासन निर्णय दिनांक २७ मे, २०१९ अन्वये प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन, पुणे यांना विभाग प्रमुख म्हणून घोषित करण्यात आले असून या प्रकल्पासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे आणि वित्त विशेषज्ज्ञ, महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प यांना या प्रकल्पासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी आता महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प संस्थेमार्फत करण्यात येणार असल्यामुळे प्रकल्प संचालक, प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प संस्था, पुणे यांना विभाग

प्रमुख आणि नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे, आणि वित्त विशेषज्ज्ञ, प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प संस्था, पुणे, यांना या प्रकल्पासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

७. महाराष्ट्र राज्य कृषि व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प संस्थेस "प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्षासाठी" राष्ट्रीयकृत बँकेत चालू खाते (Current Account) उघडण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर बँक खाते PFMS प्रणालीशी संलग्न करावे व या बँक खात्याशी सर्व प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणांची बँक खाती PFMS प्रणालीद्वारे संलग्न करावीत तसेच, प्रकल्पांतर्गत निधी वितरण सदर प्रणाली मार्फत करण्यात यावे. सदर बँक खात्यात राज्य शासनाकडून प्रकल्पाकरिता वितरीत करण्यात येणारा राज्य हिश्श्याचा व बाह्य हिश्श्याचा निधी जमा करण्यात यावा.

८. प्रकल्प अंमलबजावणी करिता अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे प्रकल्प संचालकांना थेट वितरीत निधी करण्यात येईल. या प्रकल्पांतर्गत राज्य शासन जागतिक बँकेकडून कर्ज स्वरुपात अर्थसहाय्य घेत असून वितरीत केलेला निधी कोषागारातून एकदाच काढून घेऊन वापराविना बँक खात्यात जमा करून ठेऊ नये. प्रकल्पाकरिता वितरीत निधीच्या खर्चाची निकड व औचित्याची पडताळणी प्रकल्प संचालकांनी स्वत: करावी व प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार निधी वरचेवर कोषागारातून आहरीत करावा. प्रकल्पाकरिता वितरीत निधी वापराविना बँक खात्यात पडून राहणार नाही याची जबाबदारी प्रकल्प संचालक व वित्त विशेषज्ज्ञ यांची राहील.

९. प्रकल्पाकरिता उघडण्यात आलेले बँक खाते हे केवळ महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्पाकरिताच असेल तसेच, प्रकल्पाकरिता प्राप्त होणाऱ्या निधीचा विनियोग प्रकल्प अंमलबजावणीसाठीच करावा. प्रकल्प संपल्यानंतर लेखा परीक्षण कार्यवाही पूर्ण करून सदर बँक खातेही बंद करणे आवश्यक राहील.

१०. महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाकरिता प्राप्त झालेले अनुदान त्या - त्या वित्तीय वर्षात खर्च करणे बंधनकारक राहील व त्यापुढे शासनाच्या मंजूरीने मुदतवाढीप्रमाणे खर्च करता येईल. ज्या प्रकरणी मुदतवाढ दिलेली नाही, अशा प्रकरणी सदर बँक खात्यातील अखर्चित रकमा शासनाकडे समायोजित करणे आवश्यक राहील.

११. सदर बँक खात्यातील व्यवहाराचे मासिक/ तिमाही ताळमेळ करणे तसेच लेखापरीक्षण करणे आवश्यक राहील त्याचप्रमाणे, प्रकल्पाच्या वित्तीय पुस्तिकेत नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार सदर बँक खात्याचे अंतर्गत व बाह्य लेखापरीक्षण नियमितपणे करावे.

१२. सदर बँक खाते बंद करण्यात आल्यास, त्यामधील शिल्लक रकमेचा ताळमेळ घेऊन शिल्लक अखर्चित रक्कम योग्य त्या शासन लेखाशिर्षाखाली तात्काळ जमा करावी.

१३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व अनौपचारिक संदर्भ क्रमांक २१६/२०१९/व्यय-१ आणि ३२९/२०१९/कोषा-प्रशा-५ दिनांक ३०.०८.२०१९ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१११७१४५९३५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2019.09.11 17:36:19 +05'30'

(श्रीकांत आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
२. मा. मंत्री (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
३. मा.विरोधी पक्षनेता विधानसभा/विधानपरिषद,विधानभवन,मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व संसद सदस्य/महाराष्ट्र विधानसभा सदस्य /महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य
६. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
७. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (पुदम व पणन), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
११. प्रधान सचिव (ग्राम विकास), ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई
१४. आयुक्त (कृषि) तथा प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन, पुणे
१५. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
१६. आयुक्त सहकार, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७. अतिरिक्त महापालिका आयुक्त, (सर्वसाधारण) पुणे महानगरपालिका
१८. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, मुंबई
१९. प्रकल्प संचालक, प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्ततन, पुणे
२०. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
२१. संचालक, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा, पुणे
२२. अतिरिक्त प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन, पुणे
२३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ, नागपूर
२४. व्यवस्थापकीय संचालक, ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन, मुंबई

२५. व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई
२६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकार विकास महामंडळ, मुंबई
२७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे
२८. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, मुंबई
२९. मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन, मुंबई
३०. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
३१. उप सचिव (आस्था)/ उप सचिव (८अे), कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई.
३२. महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर,
३३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३४. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
३५. कक्ष अधिकारी, कार्यासन क्रमांक - २अे कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
३६. निवड नस्ती.

परिशिष्ट – अ

(कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्रमांक :- कृव्यप्र ४६१९/प्र.क्र.५७/८-अे, दिनांक : ११ सप्टेंबर, २०१९ चे सहपत्र)

महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प या संस्थेची प्रस्तावित रचना व सदस्य

अ. क्र.	समिती सदस्याचे पदनाम	समितीतील पदनाम
१	सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव (कृषि)	अध्यक्ष
२	प्रकल्प संचालक, SMART / आयुक्त, कृषि	कार्यकारी संचालक तथा सदस्य सचिव
३	प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई	सदस्य
४	व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ	सदस्य
५	आयुक्त, पशुसंवर्धन, पुणे	सदस्य
६	प्रधान सचिव (नगर विकास) यांचे प्रतिनिधी / अतिरिक्त आयुक्त, (सर्वसाधारण), पुणे महानगरपालिका	सदस्य
७	व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई	सदस्य
८	व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे	सदस्य
९	मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, मुंबई	सदस्य
१०	संचालक, पणन, पुणे	सदस्य
११	संचालक, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा	सदस्य
१२	उप सचिव (महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प), कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
१३	अतिरिक्त प्रकल्प संचालक, SMART, पुणे	सदस्य
१४	कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे	सदस्य
१५	मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फांउडेशन, मुंबई	सदस्य
१६	व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित, पुणे	सदस्य

****